मिरा भाईंदर महानगरपालिका
सामान्य प्रशासन विभाग
मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/सा.प्र./३६९/२०२६-२७ दि.१६/०९/२०२६

## // आदेश //

**विषय :- दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविणे बाबत..**

**संदर्भ :- शासन परिपत्रक क्रमांक: सेसंअ-२०२६/प्र.क्र. ९५/रवका-२, दि.०९/०९/२०२६ सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय.**

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये दि. १७ सप्टेंबर २०२६ ते दि. १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आपल्या देशाचे **मा.पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी** यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राज्यामध्ये "सेवा संकल्प अभियान" राबविण्याबाबत शासनाने निर्देश दिलेले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये विविध विभागांमार्फत नागरिकांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देणे तसेच विविध जनजागृती व सेवा उपक्रम राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "सेवा संकल्प अभियान" प्रभावीपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे संबंधित अधिकारी/विभागांना कामकाज सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | सोपविण्यात आलेल्या कामाचे स्वरूप | जबाबदार अधिकारी | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | १. स्वच्छता मोहीम राबविणे.<br>२. प्लास्टिक मुक्तीबाबत जनजागृती करणे.<br>३. कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंगबाबत जनजागृती करणे.<br>4. स्वच्छता ही सेवा" उपक्रम राबविणे.<br>५. भविष्यात नेहमी स्वच्छता करणेकामी स्थानिक समिती गठीत करण्यात यावी.<br>६. समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता करणेकरिता उपक्रम राबविणे. | श्री. योगेश गुणीजन<br>सहा.आयुक्त,<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग | श्री. सचिन बांगर<br>उपायुक्त (मु.) |
| २ | १. मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे.<br>२. मालमत्ता कराची आकारणी करून मागणीपत्र देणे. | १.श्री. चंद्रकांत बोरसे<br>सहा.आयुक्त (कर)<br>२.सहा. आयुक्त,<br>प्रभाग समिती क्र. १ ते ६ | श्रीम. प्रणाली घोगे<br>उपायुक्त (कर) |

| अ.क्र. | सोपविण्यात आलेल्या कामाचे स्वरूप | जबाबदार अधिकारी | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|---|
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे. | सहा. आयुक्त,<br>प्रभाग समिती क्र. १ ते ६ | श्रीम. कविता बोरकर<br>उपायुक्त,<br>(समाज विकास) |
| ४ | जन्म-मृत्यू नोंदणी करणे व प्रमाणपत्र देणे. | | |
| ५ | १. महिला बचत गट नोंदणी करणे.<br>२. दिव्यांगजन उद्योग उपक्रम<br>३. फिट इंडिया खेळसत्र राबविणे. | श्रीम. दिपाली जोशी,<br>समाज विकास अधिकारी | |
| ६ | १. आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करणे.<br>२. रक्तदान शिबिर आयोजित करणे.<br>३. अवयवदान संकल्प अभियान राबविणे.<br>४. पोषण व ॲनिमिया जनजागृती करणे.<br>५. महिलांचे आरोग्य व स्वच्छता याबाबत जनजागृती करणे. | श्री.डॉ. नंदकिशोर लहाने<br>मुख्य वैद्यकीय अधिकारी | |
| ७ | वृक्षारोपण अभियान राबविणे. | श्री. नागेश विरकर<br>मुख्य.उद्यान अधीक्षक,<br>उद्यान विभाग | |
| ८ | १. "सेवा ज्योत यात्रा" आयोजित करणे.<br>२. "चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा" आयोजित करणे.<br>३. "नमो सेवागाथा" उपक्रम राबविणे.<br>४. शासन निर्णयातील मुद्दा क्र. १० अनुषंगाने "आभार आणि संकल्पाची रांगोळी" व संबंधित सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.<br>५. शासन निर्णयातील मुद्दा क्र. ७ अनुषंगाने अंगणवाडी उत्सव आयोजित करणे.<br>६. विद्यार्थ्यांची माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देणे.<br>७. वंचित मुलांसाठी शिक्षणा सहकार्य करणे. | श्रीम. सुलभा वटारे<br>शिक्षणाधिकारी | |
| ९ | शासन निर्णयातील मुद्दा क्र. ८ अनुषंगाने "आशीर्वादाचा दिवा" या उपक्रमासाठी आवश्यक लाभार्थ्यांची माहिती विहित कालावधीत उपलब्ध करून देणे. | सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख,<br>मिरा भाईंदर महानगरपालिका | श्री. दिपक खांबीत<br>प्र.शहर अभियंता<br>(सार्वजनिक बांधकाम) |
| १० | १. नवीन नळ जोडणी देणे.<br>२. जलसंधारण व जलस्रोत स्वच्छता उपक्रम राबविणे. | श्री. शरद नानेगावकर<br>कार्यकारी अभियंता,<br>पाणीपुरवठा व मलनि:सारण विभाग | |

| अ.क्र. | सोपविण्यात आलेल्या कामाचे स्वरूप | जबाबदार अधिकारी | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|---|
| ११ | रस्ते सुरक्षा जागरुकता करणे. | श्री. नितीन मुकणे<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| १२ | १. शासन निर्णयातील मुद्दा क्र. ०२ Innovation Challenge चे आयोजन व संबंधित विभागांच्या समन्वयाने आवश्यक डिजीटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देणे.<br>२. सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम राबविणे.<br>३. सरकारी योजनांची जागरुकता<br>४. "विकसित भारत संकल्प यात्रा" संदर्भातील उपक्रमांची व्यापक प्रसिद्धी करणे.<br>५. शासन निर्णयातील "बदलाची गोष्ट" या उपक्रमांतर्गत यशोगाथांचे संकलन व प्रसिद्धी करणे.<br>६. सर्व कायक्रमांचे Documentation करणे व चित्रफित करणे<br>७. करिअर कॉन्सलिंग सत्र आयोजित करणे | १. श्री. राजकुमार घरत<br>जनसंपर्क अधिकारी<br><br>२. KPMG टिम | श्री. स्वप्निल सावंत<br>उपायुक्त,<br>(जनसंपर्क) |
| १३ | १. वीर गाथा आणि सैनिकांचा सन्मान करणे.<br>२. उपरोक्त सर्व कार्यक्रमाचे अहवाल शासनास सादर करणे | श्री. सुनिल यादव<br>सहा.आयुक्त (आस्था) | |
| १४ | मतदार जागरुकता आणि नोंदणी उपक्रम राबविणे | सहा. आयुक्त,<br>प्रभाग समिती क्र. १ ते ६ | श्री. दिनेश कानगुडे<br>सचिव, |

तसेच खालीलप्रमाणे संपुर्ण कार्यक्रमाचे नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र | नोडल अधिकाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. सचिन बांगर | उपायुक्त (मु.) |

संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करून वरीलप्रमाणे सोपविण्यात आलेल्या कामांची शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. प्रत्येक नियंत्रक अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त जबाबदार अधिकाऱ्यांमार्फत आवश्यक नियोजन करून सदर उपक्रम निर्धारित कालावधीत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. तसेच शासन निर्णयानुसार अभियानांतर्गत करण्यात आलेल्या कामांचे फोटो, व्हिडिओ व रील्स संकलित करून माहिती व जनसंपर्क विभागास उपलब्ध करून देण्याचे निर्देश आहेत.

सदर अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये कोणतीही दिरंगाई होणार नाही तसेच सोपविण्यात आलेल्या कामांची पूर्तता विहित कालावधीत होईल, याची संबंधित अधिकारी यांनी वैयक्तिकरित्या दक्षता घ्यावी. सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

**(मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने)**

**डॉ. सचिन बांगर**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव**
**१. मा. आयुक्त महोदय, मि.भा.मनपा**
**२. मा. अति.आयुक्त (१ व २) मि.भा.मनपा**

**प्रत कार्यवाहिस्तव**
**संबधित अधिकारी.**